MHAH230007642024

दत्तात्र्य दिनकर घोडके
वि. बबन दगडू घोडके

## निशाणी २७ खाली आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज हा दावा दुरुस्ती करण्यासाठी दिलेला आहे. वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिनांक २१.०१.२०२५ रोजी नोंदणीकृत वाटप पत्र करुन दोघामध्ये दावामिळकतीमधील ८१ आर क्षेत्राचे वाटप केलेले आहे व त्याचा फेरफार नं १०४१० असा झालेला आहे. तसेच दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. ४ मयुर अशोक घोडके यांनी दावामिळकतीमधील अविभक्त हिस्सा सुभाष वसंत पठारे यांना खरेदी दस्त क्र. २०७८/२०२५ अन्वये खरेदी दिलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. ६ वैष्णवी सुभाष पठारे यांनी त्यांचा हिस्सा सुनिता बाळकृष्ण पुरी यांना दस्त क्र. ३७६८/२०२५ अन्वये विक्री केलेला आहे. त्यामुळे सुभाष वसंत पठारे व सुनिता बाळकृष्ण पुरी यांना दाव्यात पक्षकार करणे आवश्यक आहे. तसेच सदर पक्षकाराच्या अनुषंगाने व खरेदीखताच्या अनुषंगाने दाव्याचे पान क्र. २ वर दाव्याच्या आकारणीमध्ये दाव्याच्या अर्जात दुरुस्त करणे आवश्यक झालेले आहे. तसेच पान नं ७ कलम १२ नंतर स्टॅम्प बाबत दुरुस्ती करणे आवश्यक झालेले आहे. पान नं. ९ वर कलम १८ ड नंतर प्रतिवादी क्र. १ ते ६ प्रतिवादी क्र. १ ते ८ असे नमुद करणे आवश्यक झालेले आहे. तसेच अर्जात नमुद अतिरिक्त कलम १२ अ, १२ ब, १२ क चे खरेदीदाराच्या अनुषंगाने आहे ते नमुद करणे आवश्यक झालेले आहे. तसेच विनंती मध्ये कलम १८ ड व कलम ड(२) (३) व कलम इ, ई मध्ये प्रतिवादी यांच्या संदर्भात दुरुस्ती करणे आवश्यक

झालेले आहे. तसेच नमुद करुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

२. सदर अर्जात प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी म्हणणे दिलेले आहे व नमुद केले आहे की, वादीचा अर्ज हा कायदेशीर नाही तसेच मुदतीत नाही. वादीने खरी वस्तुस्थिती लपवुन ठेवुन दाखल केलेला आहे. अर्जात नमुद पक्ष काराना नोटीस पाठवणे गरजेचे आहे. त्याचे म्हणणे घेणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा.

३. सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द वाटप करण्याकरिता, कब्जा करण्याकरिता,जाहीर ठरावाकरिता व निरंतर मनाई हुकुम मागणी करण्याकरिता दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये अदयाप पुरावा सुरु झालेला नाही. संभावित प्रतिवादी दावामिळकतीचे खरेदीदार आहे. त्यांना दाव्यात पक्षकार म्हणुन समाविष्ठ करुन घेणे आवश्यक झालेले आहे. सदरची दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच दावा पुरावा अदयाप सुरु न झाल्यामुळे दुरुस्त करण्यास कोणतीही अडचण नाही. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. वादीचा निशाणी २७ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी १४ दिवसांच्या आत मध्ये दावा दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत दाखल करावयाची आहे.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE

Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2025.07.30 10:38:10 +0500

**ठिकाण : श्रीगोंदा** **रविंद्र भ. खवले,**

**दि. २८.०७.२०२५** **२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीगोंदा.**